# उन्मेष

२०१९-२०



शेगांव शिक्षण संस्था, शेगांव द्वारा संचालित

## सेठ ग.भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, शेगांव


**प्रकाशक**
प्राचार्य, सेठ ग.भि. मुरारका कला वाणिज्य
महाविद्यालय, शेगांव, जि. बुलडाणा

**अक्षर जुळवणी**
सौ.प्रियंका लोडम
गोकुळ कॉलनी, अकोला

मुद्रक
**मुक्ता ग्राफिक्स् अँड पब्लिकेशन**
रणपिसे नगर चौक, अकोला
मो. : ९८५०४७१५२०

**विद्यार्थ्यांच्या वितरणाकरिता**

**प्रकाशन वर्ष**
२०१९-२०२०



श्री संत सद्‌गुरु गजानन महाराज, शेगांव



स्व.श्रीमान सेठ पुरणमलजी मुरारका
संस्थापक
शेगांव शिक्षण संस्था, शेगांव



स्व.श्रीमान सेठ मुरारीलालजी चतरभुजजी मुरारका

अध्यक्ष

शेगांव शिक्षण संस्था, शेगांव

# अनुक्रमणिका

❖ संपादकीय
❖ प्राचार्यांचे मनोगत
❖ संपादकीय मंडळ
❖ साहित्य विभाग
१) वडील, घर
२) चारोळी
३) अविस्मरणीय क्षण
४) विद्यार्थ्यांचे आजचे कर्तव्य
५) आई
६) जग
७) म्हणी
८) जीवन कसे जगायला पाहीजे
९) मागणी
१०) गोरा
११) प्रार्थना
१२) स्वप्न
१३) बेटी
१४) माय, जगाचा पोशिंदा
१५) जीवन
१६) न्हाय गं आई नग तोडू माव शिक्षण
१७) असा कसा विसरला
१८) ओठावरील हास्य
१९) सावित्रीबाई
२०) अशीच आहे मी
२१) ध्येय गठण
२२) माय फादर

❖ ❖ ❖

# संपादकीय

वाचन, लेखन आणि अभिव्यक्ती ही मानवी सजिवांच्या विकासप्रणालीमध्ये महत्वाची भूमिका बजावणारी त्रिसूत्री होय. असे म्हटले तर वावगे ठरू नये. कारण माणूस हा त्यामुळेच निसर्गात उजवा ठरला हे विसरता येणार नाही. कारण निसर्ग घटकांचा विचार केला तर अनंत जीव या सृष्टी चक्रामध्ये जन्माला येतात ती कधी उपद्रवी तर कधी निरूपद्रवी या नात्याने परिचितही होवून जातात. परंतु कुठल्याही इतिहासाच्या पानाला ते वजनदार करून जात नाहीत. तुलनेत माणवप्राणी इतिहासाचा विषय होतो व इतिहास घडवतो ते त्याच्याजवळ असणाऱ्या विचार शक्तीनेच ना? त्या विचारांना आणखी प्रवाही करण्याच्या प्रवाहाचा त्या हलकासा बिंदू होण्याचा आमच्या 'उन्मेष' या वार्षिकांकाचा प्रयत्न आहे.

व्यक्तीविकास हा समाजाला अभिप्रेम असणारी सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया होय. व्यक्ती समाजघटक म्हणून समाजाच्या परिवर्तनाची चाहूल ओळखायला लागतो तेव्हा तो त्याच समाजातील माणसापेक्षा वेगळा ठरतो. कारण त्याच माणसाकडून समाज मुक्त अपेक्षा करीत राहतो. त्याआधी त्याला त्याच्या तोलामोलाचा व्हावे लागते तरच तो चिंतनीय होतो. महाविद्यालयातील प्रत्येक धडपडणारा तरूण कुठेतरी आपल्या अस्तित्वाला शोधू पाहतो. स्वतः व्यक्त होवू पाहतो. सर्व करतांना तो अडखळतो, पडतो कधी विव्हळतो कधी संपल्याच्या निर्णयापर्यंत पोहचतो अशा तरूणाला आपल्या ठिकाणी असणाऱ्या जोरकस प्रतिभेच्या बळावर जीवनाची वास्तवता हेरण्याची संधी 'उन्मेष' देतो. त्याला समाज जीवनाकडे समर्थपणे पाहण्याची आशावादी दृष्टी देतो. त्याने व्यक्त व्हावं यासाठी त्याला 'उन्मेष' सारखं विचारपीठ मिळावं म्हणून हा महाविद्यालयाचा महत्वाचा उपक्रम.

या सत्रामध्ये जे विद्यार्थी प्रविष्ठ झालेत अशा सर्व विद्यार्थ्यांना (कला- वाणिज्य) आपले वैचारिक ललित, लेख, कविता, चारोळी इ. साहित्यासह आम्ही आमंत्रित केले आहे आणि विशेष म्हणजे आमच्या या हाकेला विद्यार्थ्यांनी प्रतिसादही दिला. त्यांच्या पाऊलखुणा या 'उन्मेष' वार्षिकांकामध्ये पडलेल्या दिसतात. यासाठी आमच्या शेगांव शिक्षण संस्था शेगांवचे संचालक आदरणीय श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारका यांच्या प्रेरणा सदैव सोबत असतातच त्यामुळेच एक नवी उर्जा आम्हाला मिळते. आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय श्री राम पांडे सर यांच्या मार्गदर्शनाने उत्साह संचारला व कार्य तडीस गेले. तसेच महाविद्यालयातील प्रा. व शिक्षकेत्तर मित्रपरिवार यांनी दिलेल्या योगदानामुळे आपला 'उन्मेष' आकाराला आला.

धन्यवाद !

संपादक मंडळ

# प्राचार्यांचे मनोगत ...

आमचे ग. भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, गांव जि. बुलडाणा हे ग्रामीण भागामध्ये वसलेले महाविद्यालय आहे. ग्रामीण भागातील मुलांचा ओघ उच्च शिक्षणासाठी सातत्याने आमच्या महाविद्यालयामध्ये येत असतो. सामाजिक बांधिलकीच्या भावनेने आम्ही या सर्व मुलांच्या भविष्याबद्दल सातत्याने जागरूक राहण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यासाठी आम्ही त्यांच्या अभ्यासक्रमाच्या पूर्णतेबरोबरच त्यांच्या अंगातील सुप्त गुणांना कसा वाव दिल्या जाईल या दृष्टीने वेगवेगळ्या शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन आम्ही महाविद्यालयामध्ये वर्षभर करीत असतो. त्यांच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सातत्याने झटत असतात. त्यातीलच एक महत्वाचा उपक्रम म्हणजे 'उन्मेष' हा महाविद्यालयीन वार्षिकांक होय.

अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या ठिकाणी जाणवणाऱ्या लेखन कलेला लक्षात घेवून यावर्षी त्यांच्याकडून स्वलिखित साहित्य मागितले. ते कथा, कादंबरी, कविता, चारोळी, व्यंगचित्र यांच्या स्वरूपात त्याला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. या सर्वांना 'उन्मेषच्या' माध्यमातून एक आकार देण्यात आला. आमच्या या प्रयत्नांना सतत उर्जा, प्रेरणा देण्याचे कार्य आमच्या संस्थेचे अध्यक्ष श्रीमान सेठ मुरारीलालजी चतरभुजजी मुरारका करीत असतात. तसेच आमच्या संस्थेचे संचालक श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारीलालजी मुरारका यांचे मार्गदर्शन आम्हाला नवी दिशा देत असते. यांच्या प्रोत्साहनाने आणि महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या प्रयत्नाने हा उन्मेषचा अंक आपणासमोर ठेवत असतांना आनंद वाटतो. तरीही काही उणिवा राहिल्यास त्या आमच्या मर्यादा समजाव्यात. या उन्मेषचे वाचक- अभ्यासक स्वागत करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद !

आपला<br>
प्राचार्य<br>
ग. भि. मुरारका कला वाणिज्य<br>
महाविद्यालय, शेगांव

शेगांव शिक्षण संस्था, शेगांव

ग. भि. मुरारका कला व वाणिज्य महाविद्यालय, शेगांव

# संपादक मंडळ

प्राचार्य डॉ.अनिलकुमार राठोड

प्रा.डॉ.व्ही.एन. इंगळे

प्रा.डॉ.व्ही.एम. डेहनकर

प्रा.डॉ.व्ही.के.गायकवाड

प्रा.कु.एन.एस.राजगुरू

प्रा.डॉ.जी.डी.वाघ

●●●

# वडील

आपले वडील असे असतात,
ते आपल्या घराचे प्रमुख व्यक्ती असतात.
ते आपल्या घरातील सर्वांना सांभाळून
ठेवत असतात.
आपले वडील असे असतात,
आपण कुठे चुकलो तर ते रागवतात.
पण त्यांच्या रागवण्यात कुठेतरी
प्रेम लपलेले असते.
आपले वडील असे असतात,
आपल्याला चांगल्या सवई लावण्याचा
प्रयत्न करीत असतात.
त्यांच्यामुळे आजी, आजोबा, आत्या, काका
अशी असंख्य नाती जुळतात.
आपले वडील असे असतात,
कामावरून आल्यावर दमलेले असले
तरी, आपल्याला घरात वेळ देत असतात.
त्यांना कशीची काळजी असली तरी
ते आपल्याला माहिती पडू देत नाही.
आपले वडील असे असतात,
स्वतःच्या कुटुंबासाठी झटत असतात
ते सर्वांपेक्षा वेगळे असतात.
ते आपल्यावर खुप खुप प्रेम करीत असतात
नाही
आपले वडील असे असतात.

– अजय मोरखडे
बी. ए. भाग १

# घर

आपलं घर अस असाव,
आपल्या घरात सतत प्रेम असाव
घरात मोठ्यांचा मान सन्मान असावा
आपलं घर असं असावं.
आपल्या घरात सर्वांनी एकमेकांना समजून
घेतले पाहीजे आणि
सर्वांनी एकमेकांवर प्रेम करावं
आपलं घर असं असाव
आपल्या घरातील छोट्यांचा
उत्साह वाढविण्याचा प्रयत्न करावा
आणि आपल्या घरात वाद विवाद नसावा
आपलं घर असं असावं
आपल्या घरात देवाच्या पुजेचा
सुहास दरवळत राहावा
त्यामुळे घर प्रसन्न राहील.
आपलं घर अस असावं
सर्वांपेक्षा वेगळं असावं
जे निर्मळ, सुंदर आणि सुशिक्षीत असाव
आपलं घर अस असावं

आशिष बोदडे
बी. ए. भाग १

# आई–वडील

आई–वडील असे असतात
ते आपल्याला जन्म देणारे असतात
आई वडिलांमुळे आपले नाती जुळतात
ते आपल्यावर रागवतात पण
त्यानंतर आपल्या पाठीवर प्रेमाचाहात फिरवतात
आई–वडील असे असतात
आई वडिलांमुळेच तर आपल्याला
आजी, आजोबा, मामा, मावशी, मावशी, आत्या
अशी नाती जुळतात
आई वडिलांची सेवा हीच ईश्वरसेवा असते
आई–वडील असे असतात
ते आपल्याला चांगले वळण
लावण्याचा प्रयतन करीत असतात
आपल्याला रागवतात किंवा मारतात
त्यामध्ये सुद्धा प्रेम लपलेले असते
आई–वडील असे असतात
पण ते खुप चांगले असतात.
त्यांचा राग कधिच मनात ठेवू नये
कारण ते आपलं चांगलं व्हाव
यासाठी आपल्यावर रागवतात पण
त्यांच्या मनात प्रेम असते
आपले आई–वडील असे असतात

**– रूपाली खेडकर**
बी. ए. भाग १

# चारोळी

माणसाला जिंकायचे असते, 'भावनेने'
लगा रागाला गिळायचे असते, 'प्रेमाने'
अपमानाला जिंकायचे असते, 'आत्मविश्वासाने'
अपयशाला जिंकायचे असते, 'धिराने'
संकटांना जिंकायचे असते, 'धैर्याने'
माणसाला जिंकायचे असते, 'माणुसकीने'

### पेनाचे महत्व

पेना विना अक्षर नाही
एल परि सिंह लक लागोह
अक्षरा विना ओळ नाही
ओळी विना साक्षर नाही
साक्षरा विना नोकरी नाही
नोकरी विना सुखी संसार नाही

### ज्ञानाचे महत्व

केस वाढवून अजय देवगन
किंवा विद्या बालन होण्यापेक्षा
ज्ञान वाढवून अण्णा हजारे
किंवा किरण बेदी व्हा!

### इतिहासाचे महत्त्व

इतिहास घडविणारी माणसे
इतिहास विसरू शकत नाहीत
इतिहास विसरणारी माणसे
इतिहास घडवू शकत नाहीत
हा ही एक इतिहास आहे

**गणेश कराळे**
बी. ए. भाग १

# अविस्मरणीय क्षण

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात अनेक प्रकारचे अविस्मरणीय क्षण येत असतात. त्याच अनुभवातून व्यक्ती आपली पुढची वाटचाल करीत असतो. काही क्षण चांगले तर काही क्षण हे वाईट पण असतात. प्रत्येक व्यक्ती हा चांगल्या क्षणातून काहीना काही तर शिकत असतो. पण काही वाईट अनुभव पण माणसाला कोठेना कोठे प्रेरीत करीत असतात.

विद्यालयीन आणि त्यामध्ये महाविद्यालयीन जीवनातील क्षण असतात. हे अनुभव असे असतात की, आपण त्यांना विसरण्याचा प्रयत्न सुद्धा केला तरी आपण त्याला विसरू शकत नाही. म्हणूनच म्हणतात ना,

'विसरायचे असतात ते दिवस,
विसरायच्या नसतात, त्या आठवणी'

ही म्हण खरोखरच आहे. कारण, आपण ते दिवस तरी विसरू पण त्या आठवणी मात्र जपूनच आपल्याकडे राहतात. मला तरी वाटत माझी म्हण कोठेतरी चुकून राहिली. कारण, ती म्हण तशी नसून अशी आहे.

'गेले ते दिवस, उरल्या त्या आठवणी'

होय ना ! पण, माणूस माझ्या मते ते दिवस विसरू शकतो पण, त्या आठवणी मात्र कधिच विसरू शकत नाही. मी असे नाही बर म्हणत की, प्रत्येक व्यक्ती दिवस विसरतोच तसे नाही, काही व्यक्ती तर आठवणी सोबतचा माझा एक दिवस आणि तो झाला आता अविस्मरणीय क्षण !

मला पण माझ्या जीवनात अनेक अविस्मरणीय क्षण तसेच अनुभव आले. आणि त्या अनुभवांनी त्या काही क्षणांनी माझ्या मनात एक वेगळीच जागा बनवून ठेवली आणि माझ्या मते तो क्षण मी कधीच विसरू शकणार नाही. आणि तो क्षण विसरण्याचा प्रयत्न सुद्धा करू शकत नाही. तो अविस्मरणीय क्षण आहे 'एन.एस.एस.' कॅम्प मधील.

एनएसएस कॅम्प म्हटले की, अनेक प्रकारचे अनुभव व अनेक प्रकारच्या आठवणी हे आपल्या मनात राहतात. यामध्ये येणारे अनुभव हे काही वेगळ्या प्रकारचे असतात. कारण, या कॅम्पमध्ये आपला संवाद होतो तो ग्रामीण भागातील लोकांशी, त्याच्या जीवनशैलीची आणि त्यांच्या साध्या भोळ्याभाबळ्या स्वभावाशी. कारण, ग्रामीण भागातील लोक ही शिक्षणाने मात्र कमी शिकलेली असतात पण मनाची मात्र फार मोठी असतात.

तर अशाच ग्रामीण भागातील माझा अविस्मरणीय क्षण आहे. तो म्हणजे 'एका लोकांच्या शेतात काम करून म्हणजेच, हातमजूरी करणाऱ्या बापाचा आणि त्याच्या सहा मुलींचा' हा अनुभव, हा क्षण माझ्या मनाला इतका प्रेरित करून गेला की, मी बापावर काही लिहणार याची कल्पना सुद्धा करू शकत नाही.

'ज्या वेळेस मी त्या बापाशी संवाद साधत होते त्यावेळेस मात्र त्या बापाची कहानी

मी ऐकली ती होती एका मुलाच्या अपेक्षेपोटी झाल्या सहा कन्या. प्रत्येक माता–पित्याला आणि घरातील माणसांना वाटत की, आपल्या घराचा कुलदिपक असावा. जो आपण मरण पावल्यावर सुद्धा आपलं नावं चालवू शकेल. आपल्या कुळाच नांव चालवू शकेल. अशी प्रत्येकीची अपेक्षा असते आणि तशीच अपेक्षा या पण बापाची होती आणि त्या अपेक्षेपोटी या बापाला झाल्या त्या सहा मुली, तर बापाला विचार पडला की, सहा मुली, सहा मुलींचे लग्न, त्यांचे शिक्षण. त्या बापाने त्या मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा खूप प्रयत्न केला. पण, त्या मुली मात्र त्या शिक्षणापासून वंचित न राहता त्या स्वतः आपल्या पैशांनी शिकल्या म्हणजेच शेतात काम करून सोबत शिक्षण पण पूर्ण केले आणि बापाने मात्र सर्व आयुष्यभर त्या मुलींचा तिरस्कार केला. पण सरते शेवटी म्हणतात नाए

'मुलगी ही कोणापेक्षा कमी नाही,<br>
कां आणि यशापासून ती वंचित नाही'

तर त्या मुलींनी हातमजुरी करून आपले शिक्षण पूर्ण केले आणि आपल्या पाचही बहीनिंना शिकवून पुढे नेले आणि त्यावेळेस त्या बापाला समजले की, आज माझ्या मुली माझं नांव काढत आहेत. आणि शेवटी त्याच बापाने म्हटले की,

'मुलापेक्षा मुलगी बरी,<br>
दोन्ही कुळाचा उद्धार करी'

कारण त्याच्या मुलींनी त्या बापाचं एवढ नांव केल की, एखादा मुलगाही आपल्या बापाचं एवढं नाव नाही करणार तेवढ त्या मुलींनी केलं आणि आता तिच मुलगी त्या आई–वडिलांना आणि घरातील सर्व सदस्यांना पोसत आहे. त्या जागी एखादा मुलगा असता तर त्याने त्या आई वडिलांना म्हटलं असत की, तुम्ही काय मला शिकवल तर मी तुमचे पालन पोषण करू अस नाही म्हणत की, सर्व मुल १०० टक्के मध्ये ८० ते ६० टक्के मुलं ही अशीच असतात की, ज्या आई वडिलांनी अपल्याला जन्म देवून दुनिया दाखविली त्यांच्याशीच ते गद्दारी करतात. म्हणून मुलापेक्षा मुलगी कधीही चांगली.

या अनुभवातून एकच सांगता येईल की, असले बाप असल्या कारणाने आज मुलींची संख्या कमी झाली आहे आणि त्यामुळेच मुलगी वाचवण्याकरीता अशा बापांशी संघर्ष करण्याकरीता आज आपल्याला 'लेक माझी' या अभियानासारखे अभियान राबवल्या जावू लागले. तरिही काही बाप असे आहेत की, मुलगी झाली तर आपल्या घरात बापाचा जन्म झाला असे समजतात. पण मी एकच म्हणेल म्हातारपणात मुलगा जेवढी साथ देत नाही त्याच्या कितीतरी पटीने मुलगी साथ देते. आणि सरतेशेवटी म्हणते मुलगी मुलापेक्षा कमी नाही तिचा स्विकार करा, तिला फेकून देवू नका.

# विद्यार्थ्यांचे आजचे कर्तव्य

आज जेव्हा केव्हा वृत्तपत्र उघडावे तेव्हा तेव्हा मनाला भिवविणारी व अंतर्बाह्य शहारून सोडणारी कोणती बातमी वाचायला मिळत असेल तर ती म्हणजे विद्यार्थ्यांच्या चळवळीची. आंज कुठे तर बंगला, उद्या कुठे उत्तरप्रदेश, काश्मिरमध्येही तीच चळवळ, बिहारही तसाच पेटला, तर दक्षिणेस तीच आग पसरली. या आगीच्या भक्ष्यस्थानी पडत आहे सरकारी इमारती, जनसेवची केंद्र म्हणजे रेल्वे, नभोवाणी. त्यांनाही अग्नीच्या दाढेखाली ढकलल्या जात आहे. मोटारी, स्कूटर्स, बसेस, हॉटेल्स एवढेच नव्हे तर निरपराध लोकांची घरे व दुकानेही पेटविण्यात येत आहेत. ही संपत्ती कोणाची ? राष्ट्राचीच ना? राष्ट्र कोणाचे? आपलेच ना, मग पर्यायाने ही हानी कोणाची? राष्ट्राची. म्हणजेच तुमचीच. विद्यार्थी हा राष्ट्राचा आधारस्तंभ, राष्ट्राचा भाग्यकर्ता तोच. परंतु हा आधारस्तंभ कोसळला तर राष्ट्र उभे राहणार कसे ? आपण राहणार कुठे? जगात तोंड दाखविणार कसे? राष्ट्रपती राधाकृष्णनसारख्या समतोल विचारांच्या नेत्यानेही याबद्दल चिंता व्यक्त करावी, यापेक्षा दुःखाची गोष्ट कोणती ?

विद्यार्थी आजही आहे व यापूर्वीही होता. एवढ्या भारतीय युद्धाचे नेतृत्व करणारा व कर्मयोगाचा मंत्र देणारा श्रीकृष्ण देखील सांदिपनीच्या आश्रमात विद्याभ्यास करणारा विद्यार्थी होता. मर्यादा पुरूषोत्तम श्रीरामचंद्र हाही वशिष्ठांचा विद्यार्थी होता. लो. टिळक, म. गांधी, रविंद्रनाथ विद्यार्थी होते. ते शिक्षक होते तेव्हा त्यांचे विद्यार्थी होते. पण विद्यार्थी व राजकारण असा द्वंद समास कधीच झाला नव्हता. त्यावेळी अशा समस्याच नव्हत्या असे म्हणता येणार नाही. समस्या याहीपेक्षा गंभीर होत्या. पण विद्यार्थ्यांनी राजकरण केले नव्हते. आजची स्थिती ह्याविरूद्ध दिसते. कोणतीही राजकीय चळवळ विद्यार्थ्यांच्या सहकार्याशिवाय पार पडत नाही. कोणत्याही राजकीय प्रश्नांवर निघालेला मोर्चा, निवडणुकीची मिरवणूक विद्यार्थ्यांशिवाय भागत नाही हे असे का?

हे असे का? या प्रश्नाचा विचार करण्याची पाळी आपणांवर आली आहे. विद्यार्थ्यांनीही त्याचा विचार करावयाचा आहे.

इंग्रजी सत्तेविरूद्ध आपला देश पेटला होता. लहानापासून मोठ्यापर्यंत त्याच्याविरूद्ध द्वेष होता. पण तेव्हाही आजच्या इतकी विद्यार्थ्यांत राजकीय जागृती दिसत नव्हती. पण हे लोण आले मात्र तेव्हापासनच. आज त्याचा वणवा पसरत आहे.

राजकीय जागृती हे जिवंतपणाचे लक्षण होय. अन्याय सहन करणे हे भ्याडाचे लक्षण होय, हे मान्य. आपल्या अन्यायाची दाद मागण्याचे ठिकाण आपली शाळाआहे, बाजार नव्हे, एखाद्या मुलाला मारले तर त्याचा निषेध करण्यासाठी, एखाद्या पुढाऱ्याच्या अध्यक्षतेखाली सभा घेवून संबंधीत शिक्षकास

माफी मागायला लावणे आदी प्रकार कितपत योग्य होय? इंग्लडच्या युवराजास त्याच्या मुख्याध्यापकाने दारू प्याल्याबद्दल चोप दिला. पण इंग्लडमध्ये चळवळ झाल्याचे ऐकवित नाही. मग ते आमच्यापेक्षा मागासलेले आहेत का ? ज्या प्रश्नांशी पालकांचा संबंध आहे त्याबद्दल पालकांनी घरी झोपून आपल्या पाल्यास चळवळीची परवानगी देणे, अंतिम त्यांच्याच नाशास कारणीभूत होईल.

आज या प्रश्नांचा गंभीरपणाने विचार आज व्हायला हवा. विद्यार्थी हा भारताचा भाग्यविधाता आहे. तो आदर्श नागरिक व्हावयाचा आहे. म्हणून आदर्शत्वाची ओळख याच वयात त्याला व्हायला हवी. हे वय आदर्शाप्रत द्यावावयाचे आहे. हा कुठला अनादर्श आम्ही त्यांच्यापुढे मांडतो आहोत? पाश्चात्य व पौर्वात्य देश आज सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहेत असे आपण मानतो. त्यांच्या देशातही कोणी कोणावर अन्याय करितच नसेल असे नाही. कुठे कोण्या नव्या कुलगुरूची निवड होतच नसेल असेही नाही. आपल्याप्रमाणेच त्यांच्यासमोरही अनेक समस्या असतील. परंतु त्यांनी राष्ट्रीय संपत्तीची हानी केल्याची बातमी नाही. इंडोनेशियात विद्यार्थ्यांनी चळवळ केली हे म्हणणे कितपत योग्य आहे? कारण त्यांना राजकीय संस्थांनी राबविले होते.

राजकारणी पुरुषांना हवे असलेले चळवळी विद्यार्थी हे भावनावश असल्यामुळे लवकर भडकतात, हे हेरून त्यांना हा पवित्रा घ्यावा हे सहज आहे. परंतु आपण कोण, आपला धर्म काय, कर्तव्य काय, राष्ट्रासाठी कोणता त्याग करावा याचा अभ्यास नको का करायला? नेता व्हायचे असेल तर त्याने या गोष्टींचा विचार करायलाच हवा. परकीय शत्रू दाराशी उभे असतांना देशात अशांतता निर्माण करण्यात केवढा धोका आहे, हे जाणून घेण्याची आज गरज आहे.

विद्यार्थ्यांनी राजकारणी व्हायचे ठरविले असेल तर ते स्तुत्य आहे. पण त्याने प्रथम हे लक्षात ठेवावे की, तो प्रथम विद्यार्थी आहे. विद्येचा अर्थी– विद्या प्राप्त करणारा. या वयात त्याने ती प्राप्ती करावी राजकारण शिकायचे असेल तर तिही विद्या प्राप्त करावी व पुढे ती वापरात आणावी. त्याने देशाच्या, परदेशाच्या चळवळीच्या इतिहासाचे परिशिलन करावे, अभ्यास करावा, आपली वैचारिक बाजू भक्कम पायांवर आधारावी व मग विद्याभ्यास संपल्यावर खुशाल राजकारणात उडी घ्यावी. अशा अभ्यास विद्यार्थ्यांनी पुढे राजकारण हाती घेतले तर देशाचे भले झाल्याशिवाय राहणार नाही. देश संक्रमणावस्थेत जात आहे. देशात नवनिर्माण कार्य व्यापून हवे. सैनिक, वैज्ञानिक, संशोधक, स्थापत्यशास्त्र विशारद, कृषिपंडीत यांची गरज आहे. प्रथम या गोष्टी पहा ! समस्या असेल तर शांततेने सोडवून घ्या, पण देशाला असे बदनाम करू नका.

# आई

"स्वामी तिन्ही जगाचा
आईविना भिकारी"
मायेची आई हवी
प्रेमाने जवळ घेण्यासाठी
कठोर वागणारी आई हवी
प्रयत्नांना यश मिळविण्यासाठी.
आशीर्वाद देणारी आई हवी
आनंदाचे अश्रू ढाळणारी आई हवी.
माझ्या यशाला साथ देण्यासाठी आणि
कठोर शिकवण देणारी आई हवी.
चुका शोधण्यासाठी नि याच चुका
सुधारण्यासाठी संधी देणारी आई हवी.
पुन्हा जिद्दीने नवे पाऊल टाकण्यासाठी
आत्मविश्वासाने उभे करणारी आई हवी.
आई फक्त तुझ्यासाठी नि
फक्त तुझ्यासाठी

– सुनिल शेगोकार
बी.ए.भाग 3

# जग

या जगात सगळच चांगल असं नसतं
अस नसतं म्हणूनच सगळ जग फसतं
या जगात कुणी कुणाचा
विचार करत नाही
कळून चुकले आपल्यासाठी
कुणी दुसरा मरत नाही
आणि जो हे काम करीत असतो
तो धावपळीच्या युगात
वेळेला धरत असतो
चांगल्या कार्याला या
जगात स्थान नसते
अस नसतं म्हणूनच हे सगळ जग फसत।
या जगातील नाते पूर्ण मायाजाल आहे
आर्थिक ओलावा असला
की जवळ पूर्ण काळ आहे
आणि तो ओलावा संपला की
पुन्हा अग्नीजाळ आहे
स्वार्थाशिवाय कोणी राहत नसत
अस असत म्हणूनच
हे सगळ जग फसत
या जगात प्रेमाच्या विचाराने
राहावे लागणार
जुन्या म्हणीचा शांतीदुताचा
विचार सांगावा लागणार
दया, क्षमा, शांती हा मंत्र
आत्मसात करावा लागणार
जग हे बंदीशाळा व त्याचे
विद्यार्थी बनावे लागणार
जग आहे बंदीशाळेच व विद्यार्थ्यांच
नात माहीतच नसत
अस नसते म्हणूनच हे सगळ जग फसत

– कु.निशा गोपनारायण
बी.ए.3

# म्हणी

गोगल गाय पोटात पाय.
प्रयत्नांति परमेश्वर,
प्रयत्नाने वाळुचे कण रगडित तेलही गळे.
वन्ही तो चेतवावा रे ! चेतविताचि चेततो !
असाध्य ते साध्य करिता सायास.

सोन्याची तनु जाळतिसे आपुली पाषण मुर्तिपुढे
मुग्धे ते वद कोण पुण्य
तुझिया हातात तेणे चढे

नर करे सो नर का नारायण बन जाएगा
बोलाचिच कढी, बोलाचाच भात,
जेवोनिया तृप्त कोण झाला ?
ग्रंथ हे गुरू होत

भाग्याकरिता संकल्प करावे,
दृढनिश्चया वाढविता जावो
तैसेचि प्रयत्न करीत रहावे ?
आळस सोडोनि, केल्यानेच भाग्य कळते,
केल्यानेच स्वर्गसुख मिळते,
केल्यानेच सर्व काही होते, मानवाचे ।

मित्रा म्हणोनि प्रयत्नशिल व्हावे ।
प्रारब्धाचे थोरपण न मानावे.
कर्तव्याने चमकून उठावे । भुमंडळी उत्साहि

मनोरे मानसी ज्यांच्या । ज्यांना लोड आधार
तयांचा एकोनी टाहो । द्या देवा न येणार.

घणाचे घाव घालावे द्य गळावा घाम अंगीचा
यशोदेवी तयासाठी करीगे हार फुलांचा

गाव हा विश्वाचा नकाशा
गावावरून देशाची परीक्षा
गावाची भंगता अवदशा येईल देशा

शहरी यंत्रदिवे आली ।
गावाची उद्योग कला मेली ।
कुशल माणसे शहरी गेली ।
उद्योगांसाठी शहरी गेली
गावची बुद्धी शहरी गेली गावची समृद्धी
कष्टाळू शकती हस्तकला
सिद्ध तिही गेली ।

जाळावाचून नाही कड ।
मायेवाचून नाडी रड

वैरी न चिंती ते मन चिंती

एकाहांडीत शिजलानाही म्हणून
दुसऱ्या हांडीत कसा शिजेल?

आयुष्य उजळत ठेवाव लागत कधी
परिस्थितीच्या धगीनं तर
कधी महत्वाकांक्षेच्या इंधनान।

फुल उमलंत जबरदस्तीत उमलत नसतं
ज्या रोपाला फुल उगवणार असतं
त्या रोपान स्वतःहून ठरवलेलं असतं ।

राजा मेला तर राज बुडत नसत अन्
नवरा मेला तर घर पडत नसतं

खान तशी माती गहु तशी रोटी

ज्याच्या माथ वाजागाजा,
त्याच्या जिवाच्या अशा तुटक्या बाजा.

माग ना पुढ कयाकाढ्याच घोड

येरे उंबरा अन तोंडात पड.

**—कु.शारदा डांगे**
बी.ए.2

# जीवन कसे जगायला पाहीजे

आजच्या पोराची हिप्पी शौकाने
मान मुरडत चालते झटक्यान पोराचा तो तिवरट
स्वभाव नसला पाहीजे.
शाळा शिकून आंबेडकर झाला पाहीजे
अस इज्जतदार जीवन जगायला पाहीजे.
फुलपँन्ड आणि मनीला पोरी झुरतात
पोराच्या लेण्याला पोरीचा तो
तिवरट स्वभाव नसला पाहीजे.
शाळा शिकून इंदिरा गांधी झाली पाहीजे
असं इज्जतदार जीवन जगायला पाहीजे.
असं इज्जतदार जीवन जगायला पाहीजे
आई बाप म्हणते आपल्या मुलाला
रोज जा बाळा रोज शाळेला.
आई बापाच्या समोर हो हो म्हणतो
शाळेच्या मागे जाऊन हा शिट्ट्या वाजवितो.
पोराचा तो तिवरट स्वभाव नसला पाहीजे.
शाळा शिकुनी आंबेडकर झाला पाहीजे.
असं इज्जतदार जीवन जगायला पाहीजे
वानात नसून पण गुणात पाहीजे
चार चौघांमध्ये एकिराण पाहीजे
स्वतःच स्वतः त्याला कळले पाहीजे
असं इज्जतदार जीवन जगायला पाहीजे

सचिन उन्हाळे
बी.कॉम.2

# मैत्री

जिथे बोलण्यासाठी शब्दांची गरज नसते
आनंद दाखवायला हास्याची गरज नसते
दुःख दाखवायला अश्रूंची गरज नसते
न बोलताच सार काही समजत
ती म्हणजेच मैत्री असते.
— निलेश तिव्हाने
बी. कॉम. भाग 2

# **शायरी**

चाहे कितने भी दूर रहे
पर दोस्ती के सिसिले कभी ना कम होंगे
जब भी लगे तुम तनहा हो, पलट के देखना
तुम्हारे साये की जगह हम होंगे।

तेरे ख्याल से दामन बचाके देखा है।
दिल को बहुत आझमा के देखा है।
अजीब लगता है हर दिन तेरी याद के बिगर
हमने कुछ दिन तुम्हे भुला के देखा.

तन्हाई ना पाये कोई
साथ के बाद जुदाई ना पाये
कोई मुलाकात के बाद
ना पढे किसीको आदत इतनी के
हर सांस भी आये तो उसकी याद के बाद

—कु. शारदा श्रीराम पारेकर
बी. ए. २

# आई

आई उन्हाची सावली
आई सुखा सागर
निळ्या आकाशाएवढा
तिचा मायेचा पदर.
आई कुणाचीही असो
तिचा सम्मान करावा
तिने टाकलेला शब्द
फुलासारखा झेलावा
माऊलीच्या मायेमुळे
होतो माझा जीव तान्हा
आठवणींना फुटतो
मग अमृताचा पान्हा...

# ध्येय

ध्येय तुझे निश्चित ठेव
नशीबावर विश्वास ठेवू नको.
झेप घे आकाशी
मागे वळून पाहू नको
विज्ञानाच्या या युगामध्ये
हिम्मत तू हारू नको.
वेळ अजून गेली नाही
बेसावध तू राहू नको
यश आहे तुझ्या हाती
मागे तू फिरू नको.

— प्रविण दोसे
बी.कॉम.2

# ध्येय

चुका जीवनातील मोजण्यासाठी
निर्णय एकतर्फी घेवू नकोस
योग्यच मिळेल उत्तर तुला
ध्येय मात्र सोडू नकोस

जीवनाचा घे अर्थ ध्यानी
स्वार्थ मात्र पाहू नकोस त
सदा सत्याची साथ धर
गाणी खोट्याची गाऊ नकोस

आहे त्यात मान समाधान
लोभाला बळी पडू नकोस
कर यादी तू कमावण्याची
गमवल्यास तू रडू नकोस

दोन्ही बाजूने कर विचार
मेरी मुर्गी करू नकोस
जीवन ध्येय मिळेल तला
मागे मात्र सरू नकोस

— सोपान हरणे
बी. कॉम.2

# 'मागणी'

आज शेगांवीचा राणा श्री संत गजानन महाराज. विदर्भाची पंढरी असलेली संत नगरी या मधील मी एक रहिवासी. माझ्या बालपणापासून ते आतापर्यंत श्री संत गजानन महाराजांचे एक चमत्कारिक रूप मला आढळून आले. आजच्या युवकाला जर जीवनात खरोखरच यशस्वी व्हायचे असेल तर त्याला आपल्या अभ्यासाच्या जोडीबरोबरच एक भक्तीची आस असायला पाहीजे. पूर्वीपासून साधू संतापासून ते महाराजापर्यंत आपल्याला असे आढळून येते की याला एका भक्तीची ओढ होती आणि खरोखरच शिक्षणाबरोबर भक्तीची सुद्धा जोड असायला पाहीजे. कित्येक साधू संतांनी भक्तीचा साधा आणि सरळ मार्ग सांगितला आहे.

उगीच का बरळता ऐसे ।
बघितल्याविन संताशी ।
कळे कोणास वैभव ते।
ओतल्या जरीही धनराशी ।
निरंजन भाव । चैतन्याचा गाव ।
योगीयाचा राव । गजानन ।

मित्रांनो आज काल आपण समाजामध्ये पाहतो आहे. भक्तीमार्ग हा एक पैसा कमविण्याच्या साधनाप्रमाणे त्याकडे लोक पाहत आहेत. पण असे न करता आपण मनोभावे भक्तीमार्गाचा अंगीकार केला पाहीजे. जर भक्ती मार्गाचा आपण विचार कला तर शेगांव येथील गजानन महाराजांचे मंदिर आपल्या निःस्वार्थीपणाने भक्ती मार्गाचा संदेश देतांना आढळून येते. आज जर गजानन महाराज संस्थानचा विचार केला तर तिथे लाखो भाविक दर्शनासाठी येतात आणि या लाखो भाविकांची चप्पल ठेवण्यापासून ते जेवणाच्या आणि झोपण्याच्या व्यवस्थेपर्यंत त्यांची काळजी घेणे हे कोण्या एका व्यक्तीचे काम नाही आहे यामागे नक्कीच एका दैवी शक्तीचा हात आहे आणि असायलाच पाहीजे. नाहीतर हे अशक्य आहे असे वाटते.

साधु संतांच्या होताची धारा ।
लागे चिंत एकरूपी ।
तुज करीता वंदन। देव देवता प्रसन्न।
ऐसा थोर गजानन। तु शेगाव निवास।
भुषण अलंकार । न सौंदर्य साकार
विदेही आकार । ईश्वरूप।

म्हणून म्हणतो जिवनात फक्त एकच मागा आणि एकाच वेळेस मागा की, ज्यामुळे आपले भले होईल. पण भीक मागु नका कारण भीक ही रोजच मागीतली जाते. आज आपल्याला असे आढळूनयेते की, परीक्षा जवळ आली की विद्यार्थी देवाला भीक मागतात 'मला पास होवू दे तर मी पेढे वाटेल, एक तुला ठेवेल आणि बाकी सर्व मी खाईल' तसेच आपल्याला असे आढळून येते की, माणूस जेव्हा संकटात असतो तेव्हाच तो देवाकडे भीक मागतो, असे न करता जर आपण सुरुवातीपासून आपल्या दैनंदिन कर्तव्यापासून ते कामापर्यंत देवाचा ध्यास करून त्यांना स्मरणात ठेवून जर कार्य केले

तर कितीही कठीण कार्याला आपण मार्गी लागू शकतो.

ओळख तो आवाज ओळख ती खुण
आपल्या भक्तांसाठी तो फिरतो आहे अजून
त्याला उगम नव्हता त्याला अंत नाही
तो त्रैलोक्याचा स्वामी नुसताच संत नाही ।
त्याच स्मरण कर देहभान विसरून
तो हळुवार येईल अन कानात सांगून
।।गण गण गणात बोते।।
।।जय गजानन।।
काही नाही माझे । मागणे तुजला ।
ठेवी चरणाला जन्मोजन्मी ।
शेगांवीचा राणा श्री संत गजानन महाराज यांना माझा शतशः प्रमाण
अनंत कोटी ब्रम्हांड नायक
महाराजाधिराज योगीराज परब्रम्ह
सच्चिदानंद भक्त प्रतिपालक शेगांव निवासी समर्थ सद्‌गुरू
श्री गजानन महाराज की जय।।

—गौरव शेगोकार
बी.कॉम.2

# बोल मित्रा

कोरड्या झाल्या विहिरी
तहान गेली खोल, मित्रा
माणसे झाली कवडीमोल
धातुस आले मोल मित्रा
वाटले गेले गहु तांदुळही
येथे काल त्या घरातले पालकांक
आठवड्यापूर्वीच वाजले
जेथे लग्नाचे ढोल मित्रा

गाय वाटली, बैल वाटला
मायबापही त्यांनी वाटले
दुधाचा रंग बदलला
ममता झाली अबोल मित्रा
शिपडून रक्त हृदयातल
पिळवली ज्याने संसारशेती
सांग सावरावा कसा तोल मित्रा?

आठवण का तुलाही
तुझा वाडा खेड्यातला
पापणीतील थेंब पुसून
माझ्याशी बोल तू मित्रा
नवी नाही गोष्ट तशी
जुनीच तुला सांगतो
वाटणीच्य रेषांनीच बदलला
भारताचा भूगोल मित्र

— शुभम इंगळे
बी. कॉम. २

# गोरा

बाया माणसं म्हणतात,
सुरेशभाऊच गोरं मारकं।
इकाना राज्या नाईतं
करीन तुम्हा आम्हाले सरकं
त्या गोऱ्याले एकच खोड भारी ।
माणसांना सोडून बायांना मारी ।
अस वाटल मारत नाई;
काढला बुढ्यावर ताव,
डोयाले लागला शिंगाचा निसटता घाव।।
अस करून गोरा बाजारा आणला।
पण तो कसाबाच्या नजरेशिवाय
कोणाले नाही भिनला।।
त्याचे शिंग होते टोकदार
वाकडे तिकडे पाय।
अन भर बाजारात जो तो
आमच्या चिकण्या करून जाय।।
इकून तिकून गिऱ्हाईक आलं,
बुढा म्हणते ७ शिवाय नाई सोडत।
मी राहीलो बाजुले बुढा राहीला बाजुले
सदाशिवलेच मालक मालक करत ।।
बुढा दुरूनच सांगतो,
सदा गड्या पाचच्या कमी नाही पुरत।।
कसाई राज्या कोणी
नाथ धरते तं कोणी मोरकं ।
केल त्याईनं गोरं सरकं ।
साऱ्या कसाबाचे त्याच्या मानीवर हात ।
गोरं मान खाली करून बसलं दात खात।।
अस बोलता बोलता सौदा झाला।
माणूस माणुसकीच्या दूर गेला।।
अन् त्याचा दोर कसाबाच्या हातात दिला।
म्हणून अस वाटते की
ना घ्याव म्हैस ना घ्याव गाय।
अरे ऐईच्या पैदासले
गिऱ्हाईक त फक्त कसाबचं हाय ।
मले त्या सौद्यात ना बोला वाटे
ना काही करा वाटे
माय हृदय आले भरून ।
मग बसलो तोंड उलचक
करून व पायात दुरून ।
आमचं एकएक पाऊल
बाजाराच्या बाहेर पडते
त्या गोऱ्याची केविलवाणी
नजर आम्हावर पडते ।
मी मागे पाहून पुढे चालत होतो ।
त्याच्या आठवणी मनात घेत होतो।।
आमाले पाहून त्याचं मन येत होतं भरून।
की चालले रे हे आता आपल्याले सोडून ।
मी पाणी नाही पिलो
पाण्याचा घोट नाही गिळला।
माझ जनावर कसाबाच्या हातात दिल्यावर
'कसाब' या नाचा अर्थ कळला।

— विशाल चोपडे
बी.ए.3

## प्रार्थना

विद्यालय हे मंदिर सुंदर
प्रयाग जणू हे प्रज्ञेचे
ज्ञान दिवाळी शोभा उजळी
प्रसन्न गृह हे विद्येचे ।।१।।

इथे आरती ज्ञान भारती
उन्मेषाची अद्र फुले
अरप्रित सजले विद्यामंदिर
मांगल्याची जोत जळे ।।२।।

या वेलीवर यज्ञ तमाचा
अहम पणाचा होम करू
स्फूर्ती दिपतीला प्रेरक ऐसे
कृतीने विद्यालय सजवू ।।३।।
विद्यालय हे मंदिर सुंदर

–विपूल ताथोड
बी.ए.3

## स्वप्न

म्हणे स्वप्नात सार चालून जातं
कळत नकळत घडवून जात
ह्रदयाची धडधड वाढू लागते
गाल गुलाबी होवून जातात
आणि ओठही बोलायला आतूर होई
त्याला भेटण्याची ओढ लागे
पोचू पावती नजरेद्वारे कळत
दोघामधील दरी एका भेटीमुळे सरते
दोघांचाही होकार येताच
मन कसे खुलून जाते
जसे पावसाचे सन फुलून येते
अरे हे तर सारे स्वप्नच होते

काही मूले स्वप्नात आयुष्य
बघतात ते पुढील प्रमाणे
सुंदर मुलगी कॉलेजमध्ये दिसली की,
कॉलेज कसं विधानसभेसारखं वाटत
आणि ती मुलाकड पाहून हसली की
त्याला बिनविरोध 'आमदार'
झाल्यासारखं वाटतं
एकदा का ती लग्नाला हो म्हणाली की,
मुख्यमंत्री झाल्यासारख्य वाटत आणि
लग्नाला एक वर्ष झाला की मग
आदर्श घोटाळा केल्यासारखं वाटत
म्हणून म्हणतो मित्रांना तुम्हाला
माझा हा एकच सल्ला आहे.
मुलीच्या हसण्यावर आणि
कुत्र्याच्या शांत बसण्यावर
कधीही विश्वास ठेवू नका.

–अंकेश सिरसाट
बी.ए.3

## बेटी

बेटी बनकर आई हुँ माँ–बाप के जीवन में
बसेरा होगा कल मेरा
किसी और के आँगन में
क्यों ये रीत भगवान ने बनाई होगी
कहते है, आज नही तो कल तू पराई होगी
देके जनमभर पाल पोसकर
जिसने हमे बडा किया और
वक्त आया तो उन्ही हाथो ने
हमे बिदा किया
टूटके बिखर जाती है हमारी जिंदगी ।
पर फिर भी उस बंधन में
प्यार मिले जरूरी तो नही...
क्यों रिश्ता हमारा इतना अजिब होता है।
क्या बस यही हम
बेटीयों का नसीब होता है

– सचिन बाठे, बी.ए.3

## आई

आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
अंगणातील पवित्र तुळस
भजनात गुणगुणावी अशी संतवाणी
वाळवंटात जावं असं थंड पाणी
आई म्हणजे आरतीत वाजवावी
अशी लयबद्ध टाळी
आणि आई म्हणजे वेदनेनंतरची
पहीली आरोळी

आकाशाचा केला कागद
समृद्धीची केली शाई तरीही
आई–वडिलांची महिमा का
लिहिली जाणार नाही

ठेस लागते माझ्या पाई
वेदना होते तिच्या हृदयी
३३ कोटी देवांमध्ये
सर्वात श्रेष्ठ माझी 'आई'

– सचिन बाठे, बी.ए.3

## माँ–बाप

ना – तमन्ना सितारो की
ना आरजु है धरती की
आप जैसे माँ–बाप मिले तो
क्या जरूरत है हजारो की ।

– सचिन बाठे, बी.ए.3

## नशीब

जी माणसं हवीशी वाटतात
ती कधीच भेटत नाही
जी माणसं नकोशी वाटतात
त्यांचा सहवास संपत नाही।।
ज्यांच्याकडे जावेसे वाटते
त्यांच्याकडे जायला जमत नाही।।
ज्याच्याकडे जावू नये असे वाटते
त्यांच्याकडे जावेच लागते
जिवन नकोसे वाटते तेव्हा
काळच संपत नाही।।
क्यों याद आता है वो पल
जो लौटके नही आएगा ।
इतना मालूम ना था के
वक्त इस कदर रूलाएगा।
जि भरके जिलो आज
क्योंकी ये आज फिर कल बन जाएगा ।

– सचिन बाठे, बी.ए.3

## मैत्री म्हणजे

पहिली ओळख एका अनोळखीची
मग बनते सोबत हक्काची
एक साथ मिळते आपुलकीची
आणि जाणीव होते अतुट विश्वासाची
जी साथ देते कायमची

– सचिन बाठे
बी.ए.3

## मैत्री

आकाशापेक्षाही विशाल
सागरपेक्षाही खोल
चंदनापेक्षाही शितल
गुलाबापेक्षाही कोमल
क्षितिजाच्याही दूरवर
स्वप्नांहूनही सुंदर
प्रेमापेक्षाही प्रेमळ
गंगेपेक्षाही निर्मळ
सत्याहूनही शाश्वत
मंदिराहूनही पवित्र
जसं पावसाच्या थेंबाने
कमळाच्या पानावर
मोती होवून सजाव
तस नातं मैत्रीचं असावं...

जिवनपुष्प गुलाब सांगतो
येता–जाता रडायचं नसत
काट्यातसुद्धा हसायचं असतं
रातराणी म्हणते,
अंधाराला घाबरायच नसतं
काळोखातही फुलायच असत
सदाफुली सांगते,
रूसून बसून रहायचं नसतं
हसून खेळून जगायचं असतं.

एक अच्छा दोस्त फुल की तरह होता है कि
जिसे हम तोड भी नही सकते
और छोड़ भी नही सकते
अगर तोड दिया तो सुक जाएगा
छोड दिया तो कोई और ले जाएगा।

– सचिन बाठे
बी.ए.3

## मैत्री

काही नाती बांधलेली असतात
ती सगळीच खरी नसतात
बांधलेली नाती जपावी लागतात
काही मात्र आपोआपच जपली जातात
कदाचित यालाच मैत्री म्हणतात
मैत्री म्हणजे जिव्हाळ्याचे नाते
एक दुसऱ्याच्या भावना जा
ज्या नात्यात जपल्या जातात
ते नात म्हणजे मैत्री असते
जी मैत्री गरजेपुरती असते, ती तुटते
ज्या मैत्रीत कुठलाच स्वार्थ नसेल
तरच ती मैत्री टिकते
जिथे बोलण्यासाठी शब्दांची गरज नसते की
आनंद दाखवायला हास्याची गरज नसते
दुःख दाखवायला आसवांची गरज नसते
न बोलता ज्यामध्ये सार समजते
ती म्हणजे मैत्री असते.

– स्वप्नील खंडेराव
बी.ए.3

## माय

पडल्या पावसात माय
तू चारायची गुरं
पावसाले वाटे अपरूप
गहीवरे ते शिवारं

काखेमध्ये मी
पाठी कापसाची ओटी
माये तू कापूस वेचतेस
आम्हासाठी उपाशीपोटी

असं निंदण खुरपण
तुझी पात सदा पुढं
पाणी चालं झुळं–झुळं
दारात उभी होवून फावडं

गाय आनंदाची,
माय तू काढायची धार
कधी टाकतेस बरास
कधी खोदतेस चारं

काळ्या आईची गं माय,
तुही नित्याचीच सेवा
आता उठ हातपाय,
नाही मिळाला गं मेवा
गळकचं छत सरं,
ओल होई घर
धूप धूप करी चूल
तरी माय टाकते भाकर

– स्वप्नील खंडेराव
बी.ए.3

## मिठीत तुझ्या

प्रत्येक आनंद मिळाला होता,
मिठीत तुझ्या
प्रत्येक दुःखही विसरलो होतो
मिठीत तुझ्या

नको होता हिशोब प्रत्येक क्षणाक्षणाचा
पण, प्रत्येक क्षण घालवायचा होता
मिठीत तुझ्या

तुझ्या प्रत्येक शब्दानं झिडकारखं
अस्तित्व माझं
तरीही मन माझे विसावले
मिठीत तुझ्या

तू होवून पारधी नेहमीच
खेळावा डाव
हतबल मी पारध सामावून जावं
मिठीत तुझ्या

आव आपलेपणाचा की
भाव परकेपणाचा न कळले
पण जीव माझा गुदमरला आता
मिठीत तुझ्या

– अजय सावळे
बी.ए.3

# जगाचा पोशिंदा

धीर धर बळीराजा
नको होऊ हताश
चिज होईल कष्टाच
पडेल अन्न घशात
बैलासोबत माया तुझी
काळी आई माती
रातो रात्रदिन शेतात
पोटात न्याहारी नाई
अनवानी अन् अर्धवस्ती
साज चढवतो तू धरणीला
निसर्गाचा लहरीपणा तव
धुळीत मिळवतो करणीला
व्यापाऱ्याची साठेबाजी अन्
सावकारी कर्जाचा बोजाचा
महिना श्रावण असो की, रमजान
तुला नेहमीच घडतो रोजा
खचू नकोस लढत राहा
तुझही नशीब फडफडेल नशीब औंदा
मुलं पत्नीचा विचार कर
तुच खरा जगाचा पोशिंदा
तुला माझे शतशः प्रमाणन

– अजय सावळे
बी.ए.3

# दवबिंदू

मी इथं..... तू तिथ
सांग तुझ्यापासून मी... कसं जगू इथं
तुझ्याविना मन माझं... सुने सुने झालं
आठवणींनी गुलाबपुष्प मग...
हृदयात मावेनासे झाले
जेव्हा सुगंध तुझ्या आठवणींचा
माझ्या मनात दरवळत असतो...
तेव्हा माझ्या मनाचा थांग
मलाच गवसत नसतो...
स्वप्नांच्या झुल्यावर मन माझं झुलतं...
तुझ्या त्या आठवणीत मन माझं रमतं...
खरचं मी इथं... तू तिथं....
सांग तुझ्यापासून मी कसं जगू इथं...?

– दर्शन शेगोकार
बी.ए.3

# चारोळी

सुफ सुफ सुपारीचं पानं
बिनं काथ चुण्यानं रंगते
माझ्याईकडे पाहू नको
मले इलू इलूं होते

– दर्शन शेगोकार
बी.ए.3

# देशी नाई भेटली तर गावरानचं पितो

रोज तुले पायत जाव,
तवा तुला काईच नाई वाटलं
आता कस तुया मनात
मायाबद्दल अचानक प्रेम दाटलं

म्या तुयाइकळे पायलं की
तू तोंड कोळे करतं
माया मनात वाटे लेका
पोरगी सज्जन हाय खरचं

मी साखऱ्याहूनगोड बोलो
तरी तुले मीरचीच लागे
आता झाले काय तुये
चिपळाचे डोय जागे

कॉलेजला जाता जाता लय नखरे
करत जास म्या इच्यारलं एक डाव
त म्हणाली माला मीत्र आहे तो खास

माया देखत बोलायची
तुला उलशीकही नोती लाज
त्यान दुसरीले म्हणल म्हणून
म्हणतं मले आज,
तुले म्हणलं होतं म्या
तो पोरगा चांगला नाई
तवा तु म्हंतस की
तुले तकलीफ हाय काई
तुमी बोलत जा तवा
माया मनान आग लागत जाय
आता कशी आली कुठ्यावर
बिना पायखुटीचे देवगाय
त्यान खाल्ली तुया दुधावरची साय
आता मले पाणी टाकून
दुध खावु घालतं काय
सुटीच्या दिवस तो तुले भेटत जाय
आता कावून भेटत नाही,
मुळले का त्याचे पाय
आता तुया अदाचा आपल्या मनावर
काईच फरक नाही पडत
तु अन तुझा बंद रूप चुलीत जावुदे
जळत आता त आपुन पोरीच्या जातीले
खरच भेतो देशी नाई भेटली
तर गावरान पितो

—कु.विशाखा गोपनारायण
बी. कॉम २

# पण

दिवसही तोच... वाटही तीच...
वेळही तीच... पण ?

रात्रही तीच.... गारवाही तोच
चान्द्रमाही तोचपण ?

आसही तीच कास तीच
ध्यासही तोच .... पण ?

प्रितही तीच गीतही तेच
स्वरही तेच .... पण ?

देऊळही तेच देवही तोच
भक्तीही तीच .... पण?

भावही तोच गावही तोच
अन् नावही तेच
पण? पण? पण?

**—कु.विशाखा गोपनारायण**
बी. कॉम २

## थांबणारे संपणार

थांबणारे संपणारे
जीवनाचे गीत तू
अन् सुखाच्या सावलीची
रंगणारी प्रीत तू

कालचा अंधार गेला,
ही उषेची पावती
अंतरी माझ्या मनाच्या
साठलेली जीत तू

एक तो अंधार होता
स्पष्ट माझ्या जीवणी
संपला नाही आताशा
संपलेली रित तू ।

कोणत्या जखमा दिसाव्या
सावलीच्या अंतरी
दुःख देणाऱ्या जगाचे
झालेस का हित तू ।

जीवना तू नका,
नको तुझी ती वेदना
छळते मला तू कालही
छळतो इथे नीत तू

— दर्शन शेगोकार
बी.ए.3

## कवी

आम्हीच होतो वेडे
लागलो कवितेच्या नांदी
जीव जाळणाऱ्या जणू
घेतले वीजेस हाती...
सत्ता संपत्तीच्या मागे
कधी धावलोच नाही
या व्यवहारी जगाला
आम्ही भावलोच नाही....
आमच्या दुनियेचे आम्ही
राजे मस्त कलंदर
आणि हृदयात सदैव
ध्यास धरतो सुंदर....
राहिलो असेच भणंग
राहिलो असेच कफल्लक
आम्हा घरी तेवढे
धन शब्दांचेच
शिल्लक ... शिल्लक...

— प्रशांत पटोकार, बी.ए. 3

## शायरी

जरा सी बात देर तक रूलाती रही
खुशी में भी आँखे आँसु बहाती रही।
कोई मिल के खो गया,
तो कोई खो के मिल गया।
जिंदगी हमको बस ऐसे आजमाती रही ।
दुरीयो से फरक नही पडता है।
बात तो दिलो की नजदियोंकी से होती है ।
दिल के रिश्ते तो किस्मत से बनते है ।
वरणा मुलाकात तो जाने कितनो से होती है

— प्रशांत पटोकार, बी.ए. 3

## प्रतिबिंब

सुंदर तिच्या चेहऱ्यावर
एक चंद्रबिंब छान होते
बघतांना आरशात तिला
तीच प्रतिबिंब छान होते

वाटत होती मलाही
बघाव एकटक तिच्याकडं
निखरतांना सौंदर्य तिच
चेहऱ्यावर तिच्या हास्य होतं

नाजुकता रेखीवता
जणू रंभेची ती मूर्ती होती
बसली जेव्हा जवळ माझ्या
गालात खुदकन हसत होती

हसतांना चेहरा तिचा
किती गोड वाटत होता
जणू पौर्णिमेच्या रात्रीचा
मोहक चंद्र भासत होता...
भासत होता.....
भासत होता...

– प्रशांत पटोकार
बी.ए. 3

## कमावलं की गमावलं

कमावलं की गमावलं? जिंदगीत केल काय ?
अरे आला तसा जाशील संग नेशील तरी काय?
आज्या पज्यांची इस्टेट तुनं इकलं वावरं
म्होरच्या पिढीचा तोंडचा घास इकली भाकर

सोन्याच धुपूट निघे घरी, त्याचा कंजेल वास हाय
अरे आला तसा जाशील संग नेशील तरी काय?
मांग्याले आला दारी त्याले तू खेकसून बोलतं
कुत्र्याले करतं लुलू वर्तून रठ्ठा मारतं

काशी पंढरीची केली तू त कोराचा कोरा हाय
अरे आला तसा जाशील, संग नेशील तरी काय?
चोखट बोलला नाही कधी मतलबी तुवं गाणं
कधी केलानाही करीना टाकाले नाहीत दोन पानं

सार सळसळत हाय पेवात पेव बुळाचा वास सुटत हाय
अरे आला तसा जाशील संग नेशील तरी काय?
स्वर्गात नेऊ की नरकात यमदूत म्हणे याले
दोन पैसे फायदा जरी तठीसा घेऊन चाला मले

धनाचा धनगर जरी लेका सारा ओफय पसारा हाय
अरे आला तसा जाशील संग नेशील तरी काय?

– गणेश आढाव
बी. ए. 3

## मैत्रीण

खरचं एक तरी मैत्रीण असावी
फुलाप्रमाणे फुलणारी,
पाखराप्रमाणे उडणारी
सुगंधाप्रमाणे दरवळणारी
अशी मैत्रीण असावी
बंध मनीचे जपणारी
दुःख हृदयात खोलणारी
अशी एक मैत्रिण असावी
भोळ्या – भांबड्या मनाची
बनली जरी कोण्या राजाची
मला कधी न विसरणारी
अशी एक मैत्रिण असावी.

– गणेश आढाव, बी. ए. 3

---

## जीवन

एखाद्याला रडवण्यापेक्षा
हसवणं फार बरं असते
एखाद्याला दुखावण्यापेक्षा
आनंदी करणं फार बरं असते
एखादी इच्छा पूर्ण झाली नाही
म्हणजे जीवन संपत नसते
जेथे वाटा संपतात तेथूनच
वाटांची सुरूवात ही होत असते
होऊ जीवनात विजयी
ही आशा बाळगावीच लागते
जेव्हा कोणीच येत नसते
आधार होवून तेव्हा
आपणच आपलं जिवन
सावरायच असते
जीवनाच्या या खेळात
'सुख–दुःख' ही 'ऊन–सावली'
सारखी येतच असतात
ऊनानंतर सावली ही
प्रत्येकाला मिळतच असते
जीवनातील दुःखांना पाहून
खचायचं नसते
दुःखावर मात करून
सुख मिळवायचच असते
आणि दुःखाला सामोर
गेल्याशिवाय
सुखाचे मोल कळत नसते

– निखिल शेळके, बी ए 3

## चकवे

घडलेल्या घटनांचे,
नसावे काहीच ओझे
आपल्या वर्तमानाचे
आपणच व्हावे राजे
निसटणाऱ्या सुखाचे
कौतुक नसावे फार
सोबतीस असलेल्या दुःखाचे
माणू आभार
रस्त्याने जा कोणत्याही,
जीवन येई आडवे
चकीत करती मना,
चकवे हरेक नवे
चुकवून चकव्यांना,
जो जाई पुढे पुढेच
त्याच्यापासून यश का
राहील दूर थोडेच?
येन केन प्रकारानं
प्रसिद्धी कशास हवी?
प्रसिद्धी पेक्षा किर्तीची,
आहेच खरी थोरवी।

– गणेश आढाव, बी. ए. 3

# तुझा मार्ग ओळख

कॉलेजच्या जीवनात गायले गाणी
खऱ्या जीवनात वाहीले पाणी
शिक्षणासाठी घरापासून दूर गेला
गावामध्ये होता तसाच राहीला

तू आला रे बाळा शिक्षण घेण्यासाठी
सिनेमा तू नाही आला येथे पाहण्यासाठी
ह्या वयात तुझा फक्त एकच ध्यास
कर तू रात्रंदिवस फक्त अभ्यास

आई वडिलांचे स्वप्न तू खाक केले
त्यांना फक्त खोटंखोटं बोलले
आशा रे त्यांच्या उंचावू नको
त्यांच्या भावना तू दुखवू नको

स्वतः कर असं काही की
आई–वडिलांना तुझ्यावर अभिमान होई
उंचावनी छाती जवा समाजात जाई
माझा पोरगा साहेब झाला मन आनंदी होई

काही केल्याशिवाय जयजयकार होत नाही
प्रयत्न करणाऱ्यांची कधी हार होत नाही

– निखिल शेळके
बी ए 3

# कधी तरी बोलशील

खुप दिवसांनी पहिल्या भेटीला
किती नाकारशील?
कधी तरी बोलशील.... !

एवेढे वर्ष लोटले
माझे प्रेम डोळ्यातले
केव्हा तरी ओळखशील?
कधी तरी बोलशील...!

तुझी आठवण माझ्या
जवळ प्रेम फक्त तुझ्यावर
नजर केव्हा तरी देशील?
कधी तरी बोलशील...!

अनेक दिवस वाट
पाहिली तुझे मत ऐकण्यासाठी
माझे प्रेम पाहण्यासाठी
कधी तरी बोलशील... !

वाट पाहीन जीवनभर
बेचेन मी क्षण
जीवन जगेल तुझ्यासाठी
धी तरी बोलशील... !

– एक कवी

# शेर शायरी

१) मागो उसीसे जो दे खुशीसे ना कहे किसीसे
२) जो पहाड से टकराते है। उसे तुफान कहते है ।
और जो तुफानो से टकराते है। उसे नौजवान कहते है ।

– एक कवी

## एस.एम.एस.

अण्णा आमचा उपाशी
कसाब खातोय तुपाशी
भ्रष्टाचार आलाय घशाशी
शेतकरी लटकतोय फासाशी
जनता उभी आहे
अण्णांच्या पाठीशी
सरकार आहे आळशी
पण मनमोहन लोळतोय
सोनिया गांधींच्या पायाशी

## माये बाबा

हुंदक्याच्या गळ्यांना
दिले एक गाण तू
पुन्हा एकदा फुंकलास
प्राणायामात प्राण तू

वाळवंटात गवसलेला
तू निर्मळ झरा
भोंदूच्या गर्दीत
तूच एक 'बाबा' खरा

तुझ्यामुळे उमलले
वेदनेच्या राणी फुल
अन् त्याच्या सुगंधाने
ती सावध झाली भूलं

तुझ्यामुळे दुःख सारे
बघ झाले तळीपार
सुखानेही उघडले
न ठोठावताच दार

— एक कवी

## न्हाय गं आई नग तोडू माव शिक्षण

न्हाय गं आई नगं तोडू व मावं शिक्षण
अगं गुलामगिरीपासून करणार हाय म्या
आपल्या समाजाचं रक्षण

राजकारणी इतिहास हाय बघ, लय भारी जाणार
घडवतात जातीमंदी दंगली, अन मारामारी
ह्या काळ्या मनाच्या पांढऱ्या बगळ्यांवर
चालविणार म्या तलवारी.

डॉ. आंबेडकरांच्या विचारांचं करणार हाय म्या रक्षण
न्हाय गं आई नगं तोडू व मावं शिक्षण ।।१।।

थोडशाबी खर्चात, न्हाय पाडणार म्या तुला
शेतात कामाला जाऊन, पुस्तकं आणणार म्या मला
नगं पैसे मला, न्हाय पायजे मोबाईल मला
कॉलेजात जावून वाईट गोष्टीत, ठेवणार न्हाय म्या लक्षण
न्हाय गं आई नगं तोडू व मावं शिक्षण ।।२।।

ह्या समाजाच्या हृदयामध्ये, अन्यायाची कळ हाय
ह्याच अन्यायाला तोंड द्यायला, शिक्षणच एक बळ हाय
पोरगा आसल हुशार, तर पोरगीपण वाघीन हाय
मायलेकीचं अतुट ठेवणार हाय म्या बंधन
न्हाय गं आई नगं तोडू व मावं शिक्षण

गुलामगीरीचं आपलं जीवन, आसं आपुन समजतो
डॉ. आंबेडकरांचे इचार हे, विसरून जातो
हेच लिहितांना कागद पेन संपतो
ह्या कवितेद्वारे आई देते तुला मी वचन
न्हाय गं आई नगं तोडू व मावं शिक्षण

—नागेश शेगोकार
बी.ए.2

# आई

आई, मायेचे माहेर
संस्काराची धार
वास्त्यल्याच मंदिर
आई,
    पाखरांची चाहुल
    मुलाचं पहिलं
    पाऊल सवस्वाची उकल
    आई,
माफीचे भंडार
प्रेमाचे उदर
घराचा आधार
आई,
    कैवल्याचा झरोका
    आनंदाचा झोका
    घराचा ठोका
    आई,
सर्वस्व अर्पण
मुलाच दर्पण
जळणार तर्पण
आई,
    ममत्वाचे दान
    लेकराचे स्पंदन
    झिजणार चंदन
    आई,
सुखाची पहाट
आनंदाची लाट
फुलांची सुगंध वाट

—नागेश शेगोकार, बी.ए.2

# असा कसा विसरला

सर्वात वेगळं अस तिचं अस्तित्व
अरे! माणसा जाण रे तिचे महत्व
स्वतः वेदना घेवून हे जग तुला दाखवले
तरी सुद्धा माणसा तू तिला नाही ओळखले ।।धृ।।
स्वतःच्या घासातला घास तुले तिने चारला
स्वतः लुगडं घालते फाटके, तुला नवीन ड्रेस शिवला
पायाला चटके बसतात पण चपलाचा जोड तुला दिला
एवढे आईचे उपकार तू असा कसा विसरला ।।१।।
तुला मायेचा हात दिला तुझा लाड तिने केला
लुगड्याच्या पदरात घास तुला बांधला
तुला लागताच काही धक्का काळजाला लागला
तरी सुद्धा माणसा तू असाकसा विसरला ।।२।।
निंदतांना तिला तुझी चिंता वाटत होती
पोरगं आपलं रडत असेल ह्याच विचारात होती
तिनं कोसावरून दुध पाजाया पळत आली ती जन्मदाती
सैरावैरा जीव तिचा धावला, असा कसा तू विसरला ।।३।।
मुलगा शाळेत जातो तिच्या जीवाले रे काचन
तुझ्या वही पेनासाठी ती काड्याकुडया वेचन
वेचताना काड्याकुड्या काटा बोटाला टोचला
घळाघळा रक्त वाहीले एवढे तरी तू विसरला ।।४।।
कामावरूनी येताच भाकर तुला भाजून देई
तुला घास भरूनी उपाशी पोटी निजे तुझी आई
दिवसभर काम करूनी रात्री झोप तिला नाही येई
मायेचा हात तुझ्या डोक्यावर दिला.
तरी सुद्धा माणसा तू विसरला ।।५।।
उन्हाचे चटके स्वतः सहन करते
स्वतःच्या सावलीत तुलारे बसवते
तू सुखी रहा एवढेच देवाला मागते
रात्रंदिवस रे तुला जीव तिने लावला ।।६।।
आई तुझ्या या उपकाराला कोणाची उपमा देता येत नाही
सातजन्म तरी केली सेवा उपकार फेडू शकणार नाही
आकाशाएवढा घेतला कागद समुद्राएवढी शाही
आई तुझे उपकार लिहायला बसलो
तर लिहल्या जात नाही ।।७।।

— अजय शेगोकार, बी.ए. 3

# ओठावरील हास्य

ओठावरील हास्य अशी दावते कशाला
डोळ्यापासून आसवे
अलग करते कशाला?
आसवांचा संबंध जन्मोजन्मीचा
विलग करते कशाला
हृदयात उमललेली शब्दफुले
तुझीच मांडी होती ती
माझ्या उशाला.
आसवांचा एक थेंब स्पर्श
करून गेला माझ्या गालाला
समाजाची रीत आहे
दुःख मनी धरते कशाला?
साजणी अशी खंत का?
लावून घेते मनाला
हसरा तुझा तो चेहरा
मलीन का झाला?
पूर्वीचा तो चेहरा
पाहू दे तू मला

— गौरव शेगोकार
बी.कॉम.2

# शेर शायरी

गम इस बात का नही
की घर जल गया
गम इस बात का है की
दिया घरकाही था
— गौरव शेगोकार, बी.कॉम.2

# गणित आयुष्याचे

गणित प्रितीचे मांडले
सूत्रास त्यास बांधले
रीत जुळवीत गेलो
उत्तर बरोबर आलेच नाही
बेरीज वजाबाकी केली
शुन्य आले.

गुणाकार भागाकार केला
शुन्यच आले
रीत मात्र बदलली
जल लक
ताळा आयुष्याला
जुळलाच नाही

अपूर्ण घातांक
सारेच देवून पाहीले
आकडेमोड केली, पण
रीत कधी जुळलीच नाही.
गणित मला जमले नाही.

आयुष्याचे
दोन शब्द कधी
प्रेमाचे मिळालेच नाही

— गौरव शेगोकार
बी.कॉम.2

# मैत्री

थकलेले जीव सारे
सावलीला निजले होते
बाभळीचे झाड घराशी
फुलांनी सजले होते
पाखरांनी आपले घरटे
छपराला टांगले होते
भातकुलीचे डाव दारी
खेळ सारे मांडले होते
तेव्हा उमगले ते घर
माझ्या मित्राने बांधले होते.

— श्याम राठोड
बी.कॉम.2

# प्रेमगण

दरवेळी भेटायला येतांना तुझा
बहाना नवा असतो
आपल्या दोघांच प्रेम फुलवणारा
तो सुंदर असा दुवा असतो
मुद्र म्हणजे युद्धात आणि प्रेमात
सर्व काही माफ असत
पण भेटीसाठी जाताना
खोटं बोलण पाप असत

— श्याम राठोड
बी.कॉम.2

# हा— हा

**एस. एम. एस.**

१) पैसे मिळवण्यासाठी माणूस आरोग्य गमावतो नंतर गेलेले आरोग्य मिळविण्यासाठी कमावलेले पैसे गमावतो.

२) ज्यानी अनियतीने धन संपत्ती प्राप्त केले आहे त्याची प्रशंसा करू नका?

३) अभी नही तो कभी नही.

४) मुश्कील राहे भी आसान हो जाती है हर राह पर पहचान हो जाती है गिल कागार जो लोग मुस्कुराके करते है सामना किस्मत उनकी गुलाम हो जाती है

५) नियती कधी लाच घेत नाही या जन्मातच हिशोब रोकडा चुकता करावा लागतो

६) एकवेळी शंभर इमानदार शत्रु चालतील पण एक बेईमान मित्र नसावा.

७) आयुष्याच्या वाटेवर थांबायच नसत आयुष्याचे पैलतीर गाठायचे नशीब दुसरं कोणी लिहित नसत आपल नशीब आपल्याच हाती असत येतांना काही आणायच नसत जातांना काही न्यायच नसत मग हे आयुष्य तरी कोणासाठी जगायचं असत याच प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी जन्माला यायचं असत.

— श्याम राठोड
बी.कॉम.2

## निसर्ग

पाखरांचे पायी काट्यांचे पैजण
भारूड भजन वाळवंटी...!
सोसाट्याचा वारा गर्जते गजर
हलावी पद वेलीचाही ...

दुःखाचे डोंगर सुखाचा कळस
वाट ही डोळस चोखाळली....
एकच घनवटी आकाशी निनाद
पक्षीही साद घालताती...

धरती उसासे उमटे रानोरानी
प्राजक्त फुलांनी

– अतुल तायडे
बी.कॉम.2

## मोकाट गोर

चार मन तूरडा
पाच मन भुसा
जाऊन पोलिस पाटलाले पुसा.
पोलिस पाटील असा ना तसा
अमर खराटे न पकडला ससा
सस्याले नाही रगत ना फगत
भुषण दाभाडे देवीचा भगत
देवीले नाही फुल ना फकडी
शिवा देशमुखने वागवीली कुत्री
कुत्री ले नाही दोर ना फोर
पंकज नरोळे मोकाट गोर
गोऱ्या नाही नाथ ना फात
राहुल खेर्डे ने उचली गात

– अतुल तायडे, बी.कॉम.2

## दारिद्रयाची माळ

पेटेना चूल हो भागेना भूक हो
घरामधी टाहो भाकरीसाठी ....
भुकेच्या अग्नित होरपळले पोट
थरथरले ओठ अन्नासाठी....
पोटासाठी वणवण फिरतो दाही दिशा
आता पाहवेना दशा जीवनाची
गरीबीचे चटके असह्य भारी
जणू ती आरी लाकडावरची...
किती सोसावी कळ राहिलेना अंगी बळ
दारिद्रयाची माळ माझीया गळा

– अतुल तायडे
बी.कॉम.2

## हा – हा

गण्या दारू पिऊन घरी येतो
वडिलांना संशय येऊ नये म्हणून
लॅपटॉप उघडून बसतो
थोड्या वेळाने
वडील : गण्या दारू पिऊन आलास का?
गण्या : नाही हो बाबा !!
वडील : मग माझी सुटकेस उघडून
काय टाईप करतोस?

– अतुल तायडे
बी.कॉम.2

# सावित्रीबाई

सावित्रीबाई तू दिले नसते स्त्रियांना शिक्षण
तर काय झाले असते आज या समाजाचे लक्षण?
आजही समाजात कुठ महिलांना सन्मान आहे
स्त्रिला प्रत्येक ठिकाणी समाजात दुय्यम स्थान आहे
स्त्रिला संपवण्यचा कट रोज शिजत आहे
स्त्री भ्रूणहत्या सर्वदूर दररोज होत आहे.
जन्माच्या आधीच दिले जावे स्त्रिला मरण्याचे इंजेक्शन
सावित्री आई तू दिले नसते स्त्रियांना शिक्षण
महिलांवर अत्याचाराच्या घटना दररोज घडतात
यासाठी कित्येक नववधू घरो घरी जळतात
शिक्षण घेवून तू अबला नारीला केले मर्दानी
म्हणूनच घरोदारी झाली आता झाशींची राणी
महात्मा फुलेंच्या हातातून तू घेतले होते प्रशिक्षण
सावित्री आई तू दिले नसते स्त्रियांना शिक्षण,
तर काय, आज हा देश महिलांनी सांभाळला असता?
इंदिराजी सारखी प्रधानमंत्री भारताला मिळाली असती
मंत्री, राष्ट्रपती, महिलांना तू बनवले राज्यपाल
स्त्री शक्तीने मिळवले पन्नास टक्के आरक्षण
डॉक्टर, इंजिनिअर, पायलट, वकील होवून
तुझ्या शिक्षणाने स्त्रिचा बदलला हाल
सावित्री आई तू दिले नसते स्त्रियांना शिक्षण
स्त्री शिकली समाज सुधारला घरदार सुधारले
गोरगरीबांच्या लेकरांनीही आज शाळेचे रस्ते धरले
सावित्री आई तुझ्या शिक्षणाने जग बदलून टाकले.
महिलांनी चंद्रावर जाऊन आज चंद्रालाही झाकले
तुझ्या शिक्षणाची सवित्रीआई अशी आहे किंमत
सूर्यालाही झाकण्याची आहे आज महिलांमध्ये हिंमत
संसार चालवण्याची किमया प्रत्येक स्त्रिमध्ये विलक्षण
सावित्री आई तू दिले नसते स्त्रियांना शिक्षण
तर काय? झाले असते आज या समाजाचे लक्षण?

— रविंद्र गिरी, बी.कॉम. 2

## का अशीच आहे मी

खरचं मी कशी आहे
मनाला प्रश्न पडतो नेहमी
विचार केल्यावर उत्तर मिळतं
अशीच आहे हो मी ।।१।।

तशी मी आहे बरीच बोलकी
सारखी बडबडत असते
पण नवीन कोणी भेटलं
की माझी दातखिळ बसते ।।२।।

आपल्याच कोषात गुरफटायला
मला फार आवडत
गर्दी गोंधळ असला की
कासव व्हायला परवडतं ।।३।।

मी हसते नेहमी खुप
जीवनाचा आनंद घेते खास
पण राग येतो जास्त
करते व्यक्तिमत्वाचा ऱ्हास ।।४।।

आहे आत्मविश्वासाची कमी फक्त
करू शकते मी काम काही
सारखी मनात भिती असते
मला आहे जमेल की नाही ।।५।।

माहीत नाही मला खरचं
चांगली की वाईट मी
मात्र मी माझ्याशी प्रामाणिक
अशीच आहे हो मी

— कैलास पुंडकर, बी.कॉम.2

## मैत्री

मैत्री मध्ये एक प्रेम असते
ते साठवून ठेवणे आपले कर्तव्य असते
त्यामधये सर्वकाही माफ असते
अशी ही एक प्रेमळ मैत्री असते.

मैत्री म्हणजे मायेची आठवण असते
मनाने मनाला दिलेली प्रेमाची साठवण असते
मैत्रीचे नाते कधी तुटत नसते
अशी ही एक प्रेमळ मैत्री असते.

मैत्रीमध्ये मैत्रीणीला चांगला मार्ग दाखवणे
हे आपले कर्तव्य असते
त्यातच आपल्या मैत्रीचे यश सफल होत असते
मैत्रीमध्ये भेदभाव पाळायचा नसते
अशी मैत्री टिकून राहत असते
अशी ही एक प्रेमळ मैत्री असते.

मैत्री म्हणजे एक विश्वास आहे
तो विश्वास कधी तोडायचा नसतो
यातच मैत्रीचे खरे प्रेम दडलेले असते
त्याच विश्वासाची किंमत ठेवणे हाच मैत्रीचा सन्मान असते
अशी ही एक प्रेमळ मैत्री असते.

आयुष्याच्या वेलीवर मैत्री ही एकदा होत असते
पण ती सोडतांना खुप दुःख भोगावे लागते
मैत्री ही आयुष्यातून दूर जाते.
परंतु मनामध्ये मैत्रिणीच प्रेम साठवलेल असते
तिच्यापासून दूर जातांना दुःख नकोसे वाटते
अशी ही एक प्रेमळ मैत्री असते.

— कैलास पुंडकर, बी.कॉम.2

# का हो पुढारी

का आले दारी?
का हो पुढारी
आश्वासनासाठी की आसनासाठी ?
ठेवून विश्वास दिले मत
तुम्हा मिळाले पद
लोकशाहीसाठी
की हुमुमशाहीसाठी?
घेतले अधिकार
अन भ्रष्टाचार
नैतिकतेसाठी
की अनैतिकतेसाठी ?
का हो पुढारी
शेवटी दिल्यानं हाती तुरी
विश्वासासाठी
की पुढच्या
अविश्वासासाठी?
आता होवून नेता?
देशाला कुठे नेता?
प्रगतीसाठी की
अधोगतीसाठी...?

— प्रसाद शेंडे
बी.कॉम.2

# पांढर सोनं (कापूस)

सुरू आहे चर्चा
प्रत्येक खेड्यागावात
घेत आहेत कापूस
व्यापारी माती भावात.
औषधी, खत
बियाणे महाग
कापूस का बर स्वस्त?
शेतकऱ्यांकडे कानाडोळा
सरकार भ्रष्टाचारात व्यस्त
प्रत्येक वस्तूचे वाढले भाव
आजवर वाढतच गेले
शेतकऱ्याच्या कापसाचे
कां बर भाव कमी केले
शेतीला लाजणाऱ्या
साहित्यावर.
येथे खुपच वाढली महागाई
शेतीतून निघालेल्या कापसाला
का बर येथे भाव नाही?
याला कोण आहे दोषी
कोणाचे घ्यावे नांव
सरकारच आहे कारणीभूत
नाही देत कापसाला भाव.

— प्रसाद शेंडे
बी.कॉम.2

# संत गाडगे महाराज आणि सामाजिक कार्य

'मानवी समाज' ही निसर्गाची बुध्दिवादी अभिव्यक्ति ठरते. त्याचे कारण असे की, ज्या समाजात माणूस राहतो, तो विचारशील आहे. त्याच्या कृती उक्तीला विचारांचे अधिष्ठान असते असे म्हटल्या जाते. आणि ते खरेही आहे. दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी त्याला त्याच्या सारख्याच इतर माणसांची गरज असते. त्यामुळे आपल्या भाषाशक्तीच्या आधारे तो अनेक लोकांना एकत्र करतो. वेगवेगळ्या उद्देशांच्या अनुषंगाने सोबत आलेल्या मानवी समुहाला समाज असे म्हटल्या जाते. पुढे हा समाज आपल्या जगण्याचे अलिखित नियम बनवू लागतो. हेच अलिखित नियम परंपरांच्या माध्यमातून पुढे माणसांद्वारे रूढ होतात व माणसांनाच नियंत्रित करतात व मानवी जीवनाला बंदिस्त करतात. या परंपराचा संबंध कधी नितिमूल्यांशी नितीशी तर कधी श्रध्देशी, अंधश्रध्देशी असतो. याचे पालन करणे हे आपले एक व्यक्ति म्हणून कर्तव्य आहे याची जाणीव व्यक्तीला नेहमी असते. म्हणून त्यांच्याकडून परंपरापालनाशी कृती ही सातत्याने घडत राहते. याचा दुसरा परिणाम हा व्यक्तिच्या जीवनावर असा होतो की, तो पूर्णतया बौध्दिकदृष्ट्या परावलंबी होऊन जातो. आपली जबाबदारी आपल्यापेक्षा श्रेष्ठ शक्तीवर टाकली की आपण बिनघोर होतो ही धारणा त्याच्याठिकाणी बळावते. यामुळे ही बौध्दिक दिवाळखोरी केवळ त्या व्यक्तिलाच नव्हे तर समग्र समाजाला अवनतीच्या काठावर आणून सोडते. या अवस्थेमधून व्यक्तीला स्वतंत्र करून व्यक्तिविकासाच्या वाटेवर आणून सोडते. या अवस्थेमधून व्यक्तीला स्वतंत्र करून व्यक्तिविकासाच्या वाटेवर आणण्यासाठी सशक्त अशा विज्ञानवादी विचारांची आवश्यकता असते. ही आवश्यकता गाडगेबाबांच्या विचारकृतीच्या अंगाने पूर्ण होताना पाहायला मिळते.

गाडगे महाराजांच्या सामाजिक परिवर्तनाच्या वाटेला समजून घेण्यासाठी त्यांच्या जीवनाची प्रारंभावस्था लक्षात घ्यावी लागते. ज्या समाजामध्ये ते जन्मले त्या समाजामध्ये असणाऱ्या अनिष्ठ प्रथांचे खोल परिणाम त्यांच्य मनावर झाले. ऐपत नसतानाही सर्व सामाजिक आणि धार्मिक विधी पार पाडणे त्यातून दारिर्द्याच्या दलदलित रूतत जाणे त्यांना भयावह वाटत होते. त्यातच स्वतःच्या वडिलांचे अकाली झालेले निधन त्यांच्या मनाला चटका लावून गेले. आपल्या घरच्या हलाखीच्या परिस्थितीला व समाजाच्या रसातळाला जाण्याच्या अवस्थेला कारणीभूत असणाऱ्या कारणांची मीमांसा करण्यासाठी गाडगेबाबांनी सुरूवात केली ती प्रबोधनाच्या अंगाने.

गाडगे बाबांचे व्यक्तिमत्त्व हे कृतिशील आणि समर्पित अशा सुधारकाचे होते. अज्ञानाच्या खाईत खितपत पडलेल्या माणसांना बाहेर काढण्यासाठी त्यांनी अखंड

कर्मयज्ञ आरंभिला. हीन, दारिर्द्य ही त्यांच्या कार्याची प्रेरणा होती. त्यासाठीच ते आयुष्यभर राबलेत. सुखवस्तू कुटुंबातील माणसांनी देवाच्या चालविलेला जप पाहून ते म्हणतात की, परमेश्वर हा काही दगडात, मुर्तीत, उपासनेत भेटत नाही, तर तो गोरगरिबांमध्येच खऱ्या अर्थाने दडलेला असतो. त्याला प्राप्त करण्यासाठी 'गरिबांची सेवा करा' हा संदेश देतात.

देवाच्या नावाने सुरू असलेला धंदा त्यांना भोळ्या जनतेची चालवलेली लुबाडणूक वाटते. तिला आळा घालण्यासाठी आपण जागे झाले पाहिजेत हा विचार ते कीर्तनाच्या माध्यमातून अखंड जीवनभर मांडत राहतात.

**"नही मेहजिदमें नाही देवलमे**
**हिरा खोया कचरेमे"**

गाडगेबाबा परखडपणे जीवनाचे अमोघ असे तत्त्वज्ञान मांडतात. त्यांच्या चिंतनाला अनुभवाची डुब आहे. म्हणून त्यांच्या प्रत्येक शब्द विचाराला चालना देणारा वाटतो. प्रेम, सेवा, कष्ट, अहिंसा, त्याग आणि मानवता हे त्यांच्या घराचा त्याग केला व हे समग्र विश्व त्यांना आपले घर म्हणून स्विकारले व त्यासाठी समग्र आयुष्यभर ते झटत राहिले. कीर्तनाच्या व स्वच्छतेच्या माध्यमातून. गाडगे महाराजांनी समाजसुधारणेसाठी कीर्तन पंरपेरच्या प्रभावीपणे वापर केला. त्यांच्या कीर्तनाचा श्रोता हा सर्वसामान्य कष्टकरी, दरिद्री, अज्ञानात बुडालेला, शोषल्या गेलेला होता. त्याला जडलेल्या दारूच्या व्यसनाने त्याला कसे अर्धमेल्या अवस्थेत आणून सोडले याची प्रचिती त्यांच्या कीर्तनातून येते. दारू हे समाजाला जडलेले वाईट व्यसन आहे. या व्यसनाने समाज आर्थिक, सामाजिक, बौध्दिक आणि शारीरिक दृष्टीने कसा खंगला आहे याची जाणीव स्वतः गाडगे महाराजांना होती. त्याचे कारण स्वतःचा बापच या व्यसनापायी मृत्यू पावला होता. म्हणून समाजाने या चूकीच्या सवयीपासून स्वतःची सूटका करून घ्यावी असे गाडगेबाबा जनसमुहाला संवादी शैलीमधून सांगत होते. एकाचवेळेस बाप आणि मुलाचे तसेच पती आणि पत्नीचे नाते विसरायला ते सांगतात. बाप जर घरामध्ये दारू पिऊन येत असेल तर मुलाचं नात विसरून त्याला असे बदडा की त्याचे धोतर भरल्याशिवाय सोडू नका. असे म्हणत असतानाच स्त्रीलासुध्दा ते जागे करता. पती परमेश्वर आहे पण केव्हा जेव्हा तो आपल्या कर्तव्याला जागेल. दारू पिऊन घरात येणार नाही तेव्हा. परंतु तो जर घरात दारू पिऊन येत असेल तर त्याला धडा शिकविल्याशिवाय सोडू नका. अशी पारखड भूमिका गाडगेबाबा घेतात. दारूमुळे जमिनी गमावून भिकेस माणसे लागलीत अशी उदाहरणे एकीकडे देत असतानाच दुसरीकडे ते तुलना करतात की, दारू कोण पितो ? मारवाडी, ब्राह्मण कधी दारू पितो का? प्रगती कोणाची आहे? तर त्यांचीच. कारण त्यांच्याकडे नियोजन आहे. हे दारू पिणारे सारे मुर्दाड पहिलवान. म्हणून दारू पिऊ नका. असा संदेश गाडगेबाबा आपल्या कीर्तनामधून देतात. एकप्रकारे सामाजिक

संस्कारच गाडगेबाबा करताना दिसतात.

सामाजिक आणि व्यक्तिविकासासाठी 'शिक्षण' हे कसे महत्त्वाचे आहे याचे दाखले गाडगे महाराजांनी आपल्या कीर्तनातून दिले आहे. शिक्षण घेणारा हा दिल्लीच्या तख्तावर राज करतो तर न शिकणारा हा स्टेशनवर हमाली करतो. आपल्या लेकरांना शिक्षण द्या. घरातील ताट, वाटी मोडा पण लेकरांना शिक्षण दिल्यावाचून सोडू नका. ज्यांची शिक्षण घेण्याची ऐपत नाही त्यांनी गरिबांनी शिक्षण घेण्यासाठी मदत करण्याचे आवाहन ते करतात. असे असले तरी सामाजिक समन्वयाची भूमिका घेऊन शिक्षणाचा उद्देश पूर्ण करण्याचा विचार गाडगेबाबा मांडतात. समाजात विषमतेची फार मोठी दरी आहे. त्यामुळे गरीब श्रीमंत, कामदार नोकरदार यांच्यामध्ये निर्माण होणारा असंतोष लक्षात घेऊन सामाजिक शांतीसाठी कीर्तनाचा आधार ते घेतात. शिक्षण कसे महत्त्वाचे आहे याचे ज्वलंत उदाहरण म्हणून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार करतात. एकीकडे शिक्षण सतर दुसरीकडे अंधश्रध्देचा समाचार घेऊन यातून बाहेर पडण्याचे आवाहन गाडगे बाबा करतात. समग्र समाज हा गाडगे बाबांच्या चिंतनाचा विषय होता. यीच तळमळ त्यांच्या कीर्तनातून दिसून येते.

**निष्कर्ष**

१. वास्तवाचे गांभिर्य गाडगेबाबांच्या कीर्तनातून जाणवते.

२. समाजात अंधश्रध्देच्या गर्तेत खोल रुतलेला दिसतो.

३. गाडगेबाबांच्या कीर्तनातून शिक्षणविषयक विचार स्पष्ट होतो.

४. समग्र समाज हा त्यांच्या चिंतनाचा विषय आहे.

संदर्भ

१. भोसले, द.ता., लोकोत्तर गाडगेबाबा जीवन आणि कार्य, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई

२. मधुकर केचे, श्री संत गाडगे महाराज, साकेत प्रकाशन, औरंगाबाद

३. भगत, रा.तु., लोकशिक्षणाचे शिल्पकार, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर ४. गो. नि. दांडेकर, श्री गाडगे महाराज, मृन्मयी प्रकाशन, पुणे.

– प्रा. विनोद नामदेव इंगळे
ग. भि. मुरारका कला, वाणिज्य महाविद्यालय, शेगाव, जि. बुलढाणा






20




राष्ट्रीय सेवा योजना














मुरारका महाविद्यालय शेगांव.
विभाग


कार्यक्रम